Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैली संदर्भात शैक्षणिक संपादनाचा अभ्यास

**प्रतिभा गुलाबराव पाटील,** संशोधक
**डॉ. संजय जिभाऊ अहिरे,**मार्गदर्शक

**सारांश:**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार शिक्षणाची संधी या तरतुदीनुसार प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या आवडीनुसार अभ्यासक्रम निवडीची सोय करून देण्यात आली आहे. व्यक्ती भेदाचे तत्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे त्यांच्या अभ्यासाच्या विशिष्ट पद्धतीप्रमाणे अध्ययन करण्याची संधी प्राप्त झालेली आहे. या विद्यार्थी केंद्रित दृष्टिकोनातून निश्चित केलेल्या तरतुदीला अनुसरून माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैली संदर्भात त्यांच्या शैक्षणिक संपादनाचा अभ्यास करणे संशोधकाला आवश्यक वाटले त्या दृष्टिकोनातून सदर संशोधन अभ्यास केलेला आहे.

**पारिभाषिक शब्द :-** अध्ययनशैली, शैक्षणिक संपादन

**प्रस्तावना**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार अभ्यासक्रम निवडीची संधी त्यांना प्राप्त करून देण्याची तरतूद केलेली आहे. या तरतुदी मागचे मुख्य कारण म्हणजे विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी नुसार जर विद्यार्थ्याला अध्ययन करायला मिळाले तर ते अध्ययन अधिक परिणामकारक होईल. आजपर्यंतची शिक्षण पद्धती ही शिक्षक केंद्रित शिक्षण पद्धती पासून विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धती कडे प्रवास करत असताना विद्यार्थ्याला केंद्रस्थानी मानून त्याच्याशी संबंधित सर्व मानसिक शारीरिक सामाजिक घटकांचा आढावा घेऊनच शिक्षण प्रक्रियेतील अध्ययन अध्यापनाचे घटक निश्चित करण्यात आलेले आहेत. व्यक्ती भेदाच्या तत्त्वानुसार प्रत्येक विद्यार्थी हा दुसऱ्यापेक्षा वेगळा आहे हे लक्षात घेऊनच शिक्षण प्रक्रियेमध्ये अभ्यासक्रमाचे नियोजन केले जात आहे.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' या उक्तीप्रमाणे प्रत्येक व्यक्तीची अध्ययन करण्याची पद्धत ही इतरांपेक्षा वेगळी असते. अध्ययन प्रक्रियेतील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अध्ययन कसे करावे? किंवा या प्रक्रियेत परिणामकारक अध्ययन कसे घडून येईल?. यासाठी प्रत्येक व्यक्तीने स्वतःची अशी पद्धत समजून घेणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीची वेगळी अशी अध्ययनाची पद्धत असते तिलाच 'अध्ययनशैली' असे म्हटले जाते. काही तज्ञांनी अध्ययन शैलीच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केल्या आहेत.

**Smith -** "A distinctive and habitual manners of acquiring knowledge, skills, attitude through study or experience"

**सिगल आणि कुप -** "अध्ययन शैली ही एक एकात्मिक संकल्पना आहे की ज्यातून व्यक्तिमत्व आणि बोधात्मक रचनेची जोडणी केली जाते ".

**लेकॉक** -"अध्ययनशैली म्हणजे अध्ययनकर्त्याचे असे वैशिष्ट्य की कोणत्याही अनुदेशन परिस्थितीत तो विशिष्ट प्रतिसाद देतो."


Copyright © | JET Network, All Rights Reserved

विविध मानसशास्त्रज्ञांनी तज्ञांनी केलेल्या अध्ययन शैलींच्या व्याख्या अभ्यासल्यानंतर या अध्ययन शैलींचा नेमका विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर काय परिणाम होतो हे जाणून घेण्याच्या दृष्टिकोनातून संशोधकाने सदर संशोधन हाती घेतले होते.

**शीर्षक** :-

"माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैली संदर्भात शैक्षणिक संपादनाचा अभ्यास"

**संशोधनाची आवश्यकता**

- शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणारी, कल्पनाशक्ती जोपासणारी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य देणारी, नाविन्याची कास धरणारी अध्ययन प्रक्रिया जोपासण्याचे आव्हान स्वीकारण्यासाठी विद्यार्थ्यांच्या विविध अध्ययन शैलींचा शोध घेऊन त्यांच्या शैक्षणिक संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.
- अध्ययन प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा विषय म्हणजे अध्ययन कसे करायचे किंवा ते प्रभावी कसे होईल. या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलींचा शोध घेऊन त्यानुसार विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यास मदत होते.
- प्रत्येक व्यक्तीची अध्ययनशैली भिन्न असते व या भिन्न अध्ययन शैलीला अनुसरून अध्यापनात कोणते बदल करावेत हे समजून घेण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे ठरते.

**उद्दिष्टे:-**

- विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीचा शोध घेणे.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाचा अभ्यास करणे.
- अध्ययन शैलीच्या संदर्भात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीचा अभ्यास करणे.

**संशोधन प्रश्न:-**

- माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची अध्ययन शैली कशी आहे?
- प्रत्येक विद्यार्थ्याच्या अध्ययन शैलीला वाव मिळेल अशी वर्गातील आंतरक्रिया आहे का?
- अशी आंतरक्रिया नसल्यास वर्गात आंतरक्रिया घडून येण्यासाठी शिक्षकांनी काय करावे?
- अध्ययन शैलीनुसार विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादनूक कशी आहे?
- अध्ययन शैलीनुसार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीत काही फरक आहे का?

**परिकल्पना:-**

सक्रिय अध्ययनशैली, आकृती पूर्ण अध्ययनशैली, शाब्दिक अध्ययनशैली असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.

**शब्दसमूहाच्या कार्यात्मक व्याख्या:-**

- **माध्यमिक स्तर** :- माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या वर्गात अध्ययन करणारे मुले व मुली.
- **शैक्षणिक संपादन**:- शैक्षणिक संपादनूक म्हणजे इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना सहामाही परीक्षेत प्राप्त होणारे गुण होय .
- **अध्ययन शैली** :- अध्ययन शैली म्हणजे करुणा शंकर मिश्रा यांच्या अध्ययनशैली शोधिकेनुसार विद्यार्थ्यांची अध्ययन करण्याची विशिष्ट पद्धत होय.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**व्याप्ती व मर्यादा:-**

- सदर संशोधनाची व्याप्ती पिंपळनेर शहरातील सर्व खाजगी अनुदानित माध्यमिक शाळेतील इयत्ता नववी मध्ये शिकणारे सर्व विद्यार्थी.
- सदर संशोधनाचे निष्कर्ष हे पिंपळनेर येथील सर्व खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांमधील इयत्ता नववी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहेत .
- सदर संशोधनाचे निष्कर्ष हे इयत्ता नववी मध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहेत.
- सदर संशोधन हे शैक्षणिक वर्ष 2024 – 2025 पुरते मर्यादित आहे.

**गृहितके**

- प्रत्येक विद्यार्थ्याची अध्ययन शैली वेगवेगळी असते.
- शैक्षणिक संपादनूक मापनक्षम असून गुणांचे वितरण प्रसामान्य आहे.

**कार्यपद्धती:-**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला. सर्वप्रथम संशोधनासाठी जनसंख्या व नमुना निवड निश्चित करण्यात आली. त्यानंतर नंतर संशोधनाच्या निश्चित उद्दिष्टानुसार संशोधनाची कार्यवाही पूर्ण करून माहितीचे संकलन व अर्थनिर्वचन करण्यात आले व त्यावरून निष्कर्ष काढण्यात आले.

**जनसंख्या:-**

प्रस्तुत संशोधनासाठी जनसंख्या म्हणून पिंपळनेर येथील खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांमधील इयत्ता नववीच्या वर्गात अध्ययन करणारे सर्व विद्यार्थी अशी जनसंख्या निश्चित करण्यात आली.

**नमुना निवड:-**

प्रस्तुत संशोधनात संभाव्यतेवर आधारित यादृच्छिक पद्धतीतील गुच्छ नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून. पिंपळनेर, तालुका साक्री जिल्हा धुळे येथील खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांपैकी कै. नानासो साहेबराव पंडित पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळनेर या शाळेतील इयत्ता नववीचे 100 विद्यार्थी व विद्यार्थिनी संशोधनासाठी नमुना म्हणून निश्चित करण्यात आले..

**चले:-**

प्रस्तुत संशोधनात अध्ययनशैली हे स्वाश्रयी तर शैक्षणिक संपादनूक हे आश्रयी चल आहे.

**माहिती संकलनाची साधने:-**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलन करण्यासाठी डॉ. करुणा शंकर मिश्रा यांनी प्रमाणित केलेली अध्ययन शैली शोधिका आणि सहामाही परीक्षेत प्राप्त गुण या साधनांचा उपयोग करण्यात आला..

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:-**

प्रस्तुत संकलन केल्यानंतर संकलित माहितीचे विश्लेषण करावे लागते यासाठी संशोधकाने विद्यार्थ्यांनी भरून दिलेली अध्ययनशैली शोधिकेतील माहिती तसेच वार्षिक परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे संख्याशास्त्रीय परिमाणांच्या आधारे वर्गीकृत केली व संकलित माहितीच्या आधारे पुढील अनुमान काढण्यात आले.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**अनुमान**

**उद्दिष्ट क्रमांक 1 अनुसार अनुमान :-**

अध्ययनशैलींच्या प्रकारांपैकी सक्रिय अध्ययनशैली म्हणजेच ज्यामध्ये कृती, विचार प्रक्रिया, पंच ज्ञानेंद्रियांचा संपूर्ण सहभाग असतो अशी अध्ययन शैली असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे हे शिक्षकांनी लक्षात घ्यावयास हवे.

**उद्दिष्ट क्रमांक 2 अनुसार अनुमान :-**

उच्च, मध्यम, कमी आणि सर्वात कमी संपादनूक असणाऱ्या मुलांच्या संख्येमध्ये फरक आहे. वर्गातील मध्यम शैक्षणिक संपादनूक असणाऱ्यांचे प्रमाण हे जास्त आहे.

**उद्दिष्ट क्रमांक 3 अनुसार अनुमान :-**


अध्ययन शैली संदर्भात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीचा अभ्यास अभ्यास केला असता संशोधकाच्या असे निदर्शनास आले की, उच्च शैक्षणिक संपादनूक असणारे विद्यार्थी हे सक्रिय अध्ययनशैली व आकृतीपूर्ण अध्ययनशैली असणारे आहेत.

**कोष्टक**

| शैक्षणिक संपादनूक | सक्रिय अध्ययनशैली | आकृतीपूर्ण अध्ययनशैली | शाब्दिक अध्ययनशैली | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| उच्च (A ) 80-100% | 28 | 12 | 06 | 46 |
| मध्यम(B) 60- 80% | 22 | 21 | 08 | 51 |
| कमी (C) 40-60% | 00 | 02 | 01 | 03 |
| सर्वात कमी (D) 20-40% | 00 | 00 | 00 | 00 |
| एकूण | 50 | 35 | 15 | 100 |

**आलेख**

**विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैली संदर्भात शैक्षणिक संपादनूक दर्शविणारा आलेख**





Copyright © | JET Network, All Rights Reserved

**निष्कर्ष**

माहितीच्या विश्लेषण व अर्थ निर्वचनातून आलेल्या अनुमानांच्या आधारे अध्ययन शैली संदर्भात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाच्या मध्यमान गुणांकात फरक आढळत नाही या परिकल्पनेचा त्याग करण्यात आला.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. जोशी. ओ. एन. (१९९४) अध्यापनाचे आणि अध्यापकाचे मानसशास्त्र, सोनार, एम. (संपादक) शिक्षणाचे मानसशास्त्रीय यथार्थदर्शन भाग- २. नाशिक : कुलसचिव, यशवंतराव महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
2. पंडित बी. बी. (१९८९). शिक्षणातील संशोधन अभिकल्प, पुणे: नूतन प्रकाशन
3. भिंताडे, वि. रा. (२००५) शैक्षणिक संशोधन पद्धत, पुणे नूतन प्रकाशन.


Copyright © | JET Network, All Rights Reserved